नि. फौ. खटला क्र. **<u>१७९/२०२२</u>**
सरकार विरूद्ध गणेश
**निशाणी २८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : अनिल वसंतराव आंधळे, |
| वय | : २९ वर्षे |
| धंदा | : शेती काम, |
| राहणार | : रोहणा, ता. व जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

सन २०२२ मध्ये मी शेती काम करत होतो. सदर काळात माझेसमक्ष रेती चोरीची कुठलीही घटना घडली नाही. मला ब्रम्हपुरी रेती घाट माहिती नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले नव्हते. मी सुमेध आठवले, प्रकाश आठवले व मंगेश आठवले यांना ओळखतो कारण ते माझे मित्र आहेत. आम्ही सर्व मित्र शेती काम करतो.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/०३/२०२२ रोजी सुमेध आठवले, प्रकाश

आठवले व मंगेश आठवले व मी आरोपीच्या सांगण्यावरून त्याच्या ट्रॅक्टरमध्ये वाळु भरली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला त्यासाठी रू.१५००/— मजुरी देण्याचे ठरवले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या ट्रॅक्टरमध्ये वाळु भरत असतांना गावातील सरपंच व पोलीस पाटील त्याठिकाणी आले. आम्ही वाळु भरत असलेला रेती घ ाट ह—रास झालेला होता किंवा कसे हे मला माहिती नाही. आता मला माझे बयानातील अधारेखांकित भाग अ मला वाचुन दाखवला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानात नमुद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो व त्याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकर्णी यांचेमार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २२.०७.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.